# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०१८.

**दादा दामले - (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या लग्न स्थानी याच राशीत हर्षल ग्रह असल्यामुळे अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असण्याची दाट शक्यता वाटते. तसे असेल तर कोणाचाही धाक, दडपण, कोणी समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर लगेच अपमानास्पद वाटत असले पाहिजे. या राशीची लहान मुले तर अतिशय, खोडकर, वरात्य झाली असावीत, असेही दिसते. पण हाच हर्षल
शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना उपयुक्त, प्रगतिकारक व यशदायक होणे संभवते. पण या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात सप्तम या केंद्रस्थानी रवि ग्रह भाग्योदयकारक असला तरी अनारोग्यकारक होणे संभवते. त्यामुळे या राशीच्या काही मंडळींना पोटविकार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. याच स्थानी शुक्र ग्रहही असल्यामुळे या राशीच्या मंडळींना वैवाहिक जीवनातील सुख समाधान मिळेल; पण त्यासाठी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. ज्यांचे प्रेमसंबंध असतील त्यांचे विवाह होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. इच्छा आकांक्षा अपूर्ण राहतील. हाती घेतलेल्या कार्यात अडथळे, अपयश येणे संभवते. काहींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. पण।बुध - गुरु ग्रह अनुकुल असल्याने मनोनुकुल घटनाही घडतील व दिलासा मिळेल. ज्यांच्या जन्मकुंडलीत योग आहे अशापैकी काहींना अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. भाग्य स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे शुभ घटनाच घडतील व काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. पण यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना, औषध विक्रेत्यांना काळ अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे तोच नोकरी-व्यवसाय मनापासून करावा. महिन्याच्या उत्तरार्धात कष्ट-परिश्रमानेच अर्थप्राप्ती होईल. पण काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती देईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्यांना सर्वांगीण आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. शिवाय दु:ख, भांडणाचे प्रसंग टाळता आले पाहिजेत. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे नवे स्नेहसंबंध जुळून येतील, काहींना प्रवासाचे योग येतील, तर काहींना अर्थलाभ होणेही संभवते. विवाहेच्छूचे विवाह होतील. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे आपले कर्तृत्व सिद्ध करू शकाल; तर काही जण उदार मनाने इतरांना मदत करतील. पण हाच राहू काहीही कारणाने बंधुसुखात बाधा आणू शकेल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि ग्रह आरोग्यविघातक व अपेक्षाभंग करणारा असाच सिद्ध होईल. त्याच्यामुळे असमाधानकारक घटना घडणेही संभवते. महिन्याच्या प्रथम सप्ताहात मंगळ ग्रहामुळे मानहानी होणे, प्रवासात त्रास होणे अशापैकी घटना घडणे संभवते. नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडतील, जपा. मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थ व्यापार असणारांना संपूर्ण

महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना व औषध विक्रेत्यांना केवळ महिन्याचा उत्तारार्धच अनुकुल व लाभदायक होईल. इतर व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल ग्रह अत्यंत प्रतिकुल असून त्याच्यामुळे काही मंडळींना सांपत्तिक अडचणींना तोंड द्यावे लागेल, तर काहींवर वाईट, जिवावरचे प्रसंग बेतण्याची शक्यता दिसते. काही मंडळींशी अकारण शत्रुत्व निर्माण होईल तर काहींवर बेअब्रूचे प्रसंग ओढवण्याची शक्यता दिसते. जपा. मनावर संयम ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करा. त्यामुळे फारसा मनस्ताप होणार नाही व झालाच तर तो सुसह्य होईल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. “ ओम नम: शिवाय “ मंत्राचा दररोज एक माळ जप करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास सहन करावा लागेल. तसेच प्रिय जनांपासून दूरत्व आल्यास अस्वस्थ व्हाल. त्यात भर म्हणून मुलांपैकी कोणाच्या आजाराची समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. पण महिन्याचा उत्तरार्ध एकदम अनुकुल, प्रगतिकारक व भाग्योदयकारक जाण्याची शक्यता आहे. बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना अधिक लाभदायक होईल. हितशत्रू पराभूत होतील. गुरु ग्रहामुळे आरोग्य चांगले राहील; मात्र हृदयविकार असणारांनी मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून, सहनशील बनून आचरण करणेच हितावह होईल. बुध -शुक्र ग्रहांची अनुकुलता असल्याने कार्यसिद्धी होईल, काहींना प्रसिद्धी मिळेल, तर काहींना अर्थलाभ होणे संभवते. तसेच शुक्र ग्रहच्या अनुकुलतेने कलात्मक छंद असणारांना कलेत प्रगती करणे शक्य होईल. धनस्थानी असलेल्या राहूमुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच कौटुंबिक जीवनात विविध कारणांनी वाद, भांडणे होणे संभवते. पण वैवाहिक जीवनात जीवनसाथीची . उत्तम साथ मिळेल. जलभय असल्याने जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका, तसेच विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार बळवतील. जपा. काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करीतसे दिसते. जपा. महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. तसेच या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या केतुमुळे कौटुंबिक सुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच शारीरिक उष्णता भडकून काही मंडळींना मुखदंत रोग तर काहींना त्वचारोग, रक्तविकार असे आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. आध्यात्मिक उपासनेत प्रगती होईल. काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे मित्रांशी वाद, भांडणे होण्याची शक्यता आहे. जपा. या हर्षलमुळे काय घडू शकेल हे निश्चित सांगता येत नाही; पण अर्थलाभ होणे मात्र संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा “चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ अनारोग्यकारक व मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. या महिन्याच्या काळात सतत अपमानकारक घटना घडणे संभवते. त्यामुळे चिडखोर, संतप्त व्हाल व त्यातून सूडभावना निर्माण होईल.जपा. शिवाय शारीरिक आरोग्यावर परिणाम होणेही

संभवते. जपा. काही मंडळींना वातविकार त्रस्त करतील. चतुर्थ स्थानी असलेल्या रवि ग्रहामुळे कौटुंबिक जीवनात

त्रास, दु:ख, आर्थिक चिंता, कार्य दिरंगाई, अनारोग्य यांचा त्रास होणे संभवते. पण ज्यांची शेतीवाडी आहे अशांना शेतीवाडीपासून आर्थिक लाभ होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात पंचम स्थानी असलेल्या रवि -बुध ग्रहांमुळे संतती व जीवनसाथीच्या आरोग्यविषयक व अन्य मनस्ताप देणाऱ्या घटनांमुळे त्रस्त व्हाल.

नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काळ सुसह्य होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी गुरु ग्रहाच्या धनु राशीत असलेला शनि चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसायास व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच कोळसा, लोखंड यांचा व्यापार असणारांनाही लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले मंगळ व केतू हे ग्रह वैवाहिक जीवनातील सुखास प्रतिकुल असून जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतही वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुख मिळणे कठीण होईल. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर मंगळ ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करीलसे दिसते. तसेच अपघात भय असून हाडमोड होणेही संभवते. जपा. विजेपासून धोका असल्याने विजेवर चालणारी उपकरणे जपून व सावधानतेने हाताळा. जलभय , विषभय असल्याने बाहेरील उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. जलप्रवास करू नका. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “शिवलीलामृत” स्तोत्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईलसे दिसते. काही मंडळींना बढती, कोणास एखादे उच्च पद तर कोणास मानाचे स्थान मिळणे संभवते. त्यामुळे अर्थलाभही संभवतो. पण महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता दिसते. असे असले तरी बुध -गुरु ग्रहांच्या अनुकुलतेने मित्रसुख मिळेल. कुटुंबिक सुख मिळेल, पण नातेसंबंधातील कोणाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. नियोजित कार्यात दिरंगाई होणे, अकारण नको तो खर्च करावा लागणे, त्यामुळे मनस्ताप होणे, अनारोग्य होणे संभवते. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही भाग्यवान मंडळींना भूमिलाभ होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या त्याच्या उच्च राशीत मंगळ ग्रह असला तरी तो आरोग्यविघातकच आहे. त्यामुळे उष्णता विकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. इजा होणे, ताप येणे, अंगावर फोड येणे, काही मंडळींना रक्तविकाराचा तर काहींना हृदयविकाराचा त्रास होणे, आर्थिक नुकसान होणे, अपप्रचाराचा त्रास होणे अशापैकी त्रास होणे संभवते. पण हा मंगळ यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच वैद्यकीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल ,प्रगतिकारक व यशदायक होईल. मंगळाच्या कार्याला केतूची साथ मिळून नियोजित कार्यात अपेक्षेपेक्षा अधिक प्रगती होईल. पण हा मंगळ या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर मात्र प्रतिकुल होईल. त्यामुळे पतिपत्नीपैकी कोणाच्या तरी अनारोग्यामुळे किंवा दोघांतही

वाद, गैरसमज अशापैकी कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांच्या भागीदारीत संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी बाधा येणे संभवते. मंगळासह असलेल्या नेपच्यूनमुळे काल्पनिक चिंता व एखादी आजारभावना त्रस्त करील. भाग्य स्थानी असलेल्या हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाची तर काहींना प्रदेशगमनाची संधी प्राप्त होईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळेही वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे शक्य आहे. पण हा राहू हितशत्रूपासून रक्षणही करू शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल. दररोज स्नानानंतर “श्री गणपति अथर्वशीर्षाचे “ पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. पण हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. तसेच भावंडापैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुख मिळू शकेल; पण काहीही कारणाने वाद, भांडणे, वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करील. तसेच आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. काही मंडळींना उष्णतेमुळे डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. प्रवासाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अपेक्षित गृहसौख्य मिळणार नाही. काही ना काही कारणाने मनस्थिती अस्वस्थ राहील. काही मंडळींना मातेच्या आजाराची चिंता त्रस्त करील. महिन्याच्या प्रथम सप्ताहात संततीपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्यामुळे त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील; तर काहींना पोटाच्या अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर मंगळ ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर उष्णताविकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. शिवाय अर्थहानी होणेही संभवते. पण वैद्यकीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना हा मंगळ अनुकुल होईल. नेपच्यूनमुळे काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असण्याची काल्पनिक चिंता त्रस्त करील. काही मंडळींना फसवणूक झाल्याचा त्रास होणे संभवते.

अपघात भय असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत सावधानतेने आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. वाहन अति वेगाने चालवू नका. वाहन चालवताना मोबाईलवर बोलू नका. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे अधिकाराचा गैरवापर करून वाममार्ग धन मिळविण्याचा मोह अनावर होईल. पण हा मोह होत्याचे नव्हते करून टाकील याची जाणीव ठेवून सुयोग्य आचरण करा. काही मंडळींना लॉटरी, जुगार अशा गोष्टींचा मोह अस्वस्थ करील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनस्वास्थ्य देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा ”चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याचा काळात आपल्या शारीरिक-मानसिक आरोग्याकडे अधिक लक्ष देणे अगत्याचे होईल. कारण उष्णता विकारांचा आजार त्रस्त करण्याची दाट शक्यता दिसते. काही मंडळींना डोळ्याचे आजार त्रस्त करतील. काहींना रक्तविकार त्रस्त करतील. काही मंडळींना अतिशय थकवा जाणवेल, तर काहींना वाढत्या खर्चाची किंवा अन्य कसली तरी चिंता त्रस्त करील. आर्थिक नुकसान होणेही संभवते. अशा परिस्थितीत ज्यांना हृदयविकार आहे त्यांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. असे असले तरी बुध -गुरु-शुक्र या शुभ ग्रहांची अनुकूलता असल्याने कुटुंबात व व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या काही

युवकांना मनासारखी उत्तम नोकरी मिळेल; तर काहींना मनासारखे आवडते कार्यक्षेत्र मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ -केतूमुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहात घरात भांडण तंटे , असमाधानकारक घटना घडणे संभवते. नंतरच्या काळात संततिविषयक समस्या त्रस्त करील. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काहींना स्थावरसंबंधी समस्या मनस्ताप देण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मंगळ ग्रहासह नेपच्यून असल्यामुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती अति भावनाशील होणे संभवते. अध्यात्मात रस असणारांना हा नेपच्यून आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल होईल. . या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे वैवाहिक जीवनात जीवनसाथीचे विक्षिप्त, लहरी वागणे, पतिपत्नीत गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या दशम स्थानी असलेला राहू नोकरदार मंडळींना अनुकुल असून काही मंडळींना बढती, काहींना अधिकार पद मिळण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या काहींचा सन्मान होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा”स्तोत्राचे पठण करा,.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने बौद्धिक व बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना, या राशीच्या लेखकवर्गाला काळ काही प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण बुधामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील व त्यामुळे काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. तसेच मित्रद्रोह होणे संभवते. जपा. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडतील व त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. काहींना गलितगात्र थकावट जाणवेल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी व मनाचा क्षोभ होणार नाही, हे बघावे. धनस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच काही मंडळींना आर्थिक चिंता त्रस्त करील. महिन्याच्या प्रथम सप्ताहात मंगळ ग्रह अनुकुल होईल; पण नंतरच्या काळात गैरसमजाने वा अन्य कारणाने कुटुंबात वाद, भांडणे होणे संभवते. तसेच काही असमाधानकारक घटना घडणेही शक्य दिसते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल ग्रह शास्त्रीय संशोधन कार्यास पूरक असला तरी या राशीच्या मंडळींनी सतत अति विचार करू नये. कारण त्यामुळे डोकेदुखी किंवा मेंदूविकार होणे संभवते. जपा. काही मंडळींना मुदतीचा ताप येणेही शक्य दिसते. जपा. या राशीच्या भाग्य स्थानीअसलेला राहू महत्त्वाच्या ग्रहांशी अशुभ योग करीत असल्यामुळे बुद्धी विकृत झाल्यास हातून नको ते घडू शकेल . जपा. या राहूमुळे प्रवासयोग येणेही संभवते. या राशीच्या मंडळींचा स्वभाव हट्टी, संतापी, अहंकारी असल्यामुळे सध्याच्या प्रतिकुल काळात त्यांनी मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून, सतत सहनशील बनून नम्रतेचे आचरण करावे, तरच प्रतिकुल काळ सुसह्य होईल व शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद लुटणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात स्वतः:च्या व जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्येकडे विशेष लक्ष देणे अगत्याचे होईल. काही मंडळींना उष्णताविकाराचा तर काहींना वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळींना आर्थिक समस्याही त्रस्त करतील. सध्या भावनाशील मनस्थिती असल्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण

झाल्यास तसेच कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व झाल्यास मन निराश होईल. गूढ विद्या, अध्यात्म यासाठी काळ अनुकुल असल्याने या राशीच्या मंडळींनी आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवल्यास मनस्वास्थ्य मिळू शकेल. शिवाय महिन्याच्या पहिल्या सप्ताहानंतर मंगळ ग्रहही अनुकुल होत असल्याने धैर्य, हिम्मत वाढेल, हातून एखादे उच्च बौद्धिक कर्तबगारीचे काम घडून येईल व खूप बरे वाटेल. काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही मंडळींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ मिळण्याची शक्यता आहे. या राशीच्या सर्वप्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही कर्तृत्ववान व भाग्यवान मंडळींना प्रसिद्धी, काहींना एखादे मानाचे स्थान किंवा उच्च पद मिळू शकेल. स्वराशीतील शुक्र ग्रहामुळे सुख, समाधान, ऐषाराम, मन:शांती मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर परिस्थितीत बदल होणे संभवते. कौटुंबिक त्रास, प्रवासात अडचणी येणे, मनाविरुद्ध घटना घडणे, अनारोग्याचा त्रास होणे संभवते. त्यामुळे अस्वस्थ व्हाल. जपा. पण व्यय स्थानी असलेला गुरु ग्रह सामाजिक कार्य व अध्यात्म यास अनुकुल असल्याने या कार्यात कार्यरत असणारांना सात्विक सुखसमाधान लाभेल. आपली राशी श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची स्वराशी असल्याने या राशीच्या मंडळींनी मनःस्वास्थ्यासाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची उपासना करावी. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे"चे पठण करावे.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना शनि ग्रहाची साडेसाती चालू आहे. त्यामुळे काळ प्रतिकुल आहे याची जाणीव ठेवूनच सतत सावधानतेने व विचारपूर्वक आचरण करणे सुखाचे होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. तसेच सतत मानहानी होणाऱ्या व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच सर्व आर्थिक व्यवहारही विचारपूर्वक व सावधानतेने करा. या महिन्याचा प्रथम सप्ताह सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना प्रतिकुल असून त्यांना कठोर परिश्रम, दगदग सहन करावी लागेल. स्वभाव हट्टी व मानापमान फार असणारा असेल तर अधिकच मनस्ताप होईल. जपा. नंतरचा काळ अनुकुल असला तरी उष्णताविकार व आर्थिक समस्या त्रस्त करतीलच. पण नोकरीचे दृष्टीने संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. तसेच स्वतंत्र व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक होईल. काहींना बढती तर काहींना अधिकार पद, मानाचे स्थान किंवा उच्च पद मिळणेही संभवते. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. थोरामोठयांच्या ओळखी होतील. विवाहेच्छूचे विवाह ठरतील व संपन्न होतील. वाहनसुख मिळेल. नवे मित्र मिळतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना सहज शैक्षणिक प्रगती करणे व अपेक्षित यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे आहे त्या परिस्थितीत सुख, समाधान लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. कोणाशी पटणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहू ग्रहामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. जपा. मनात कपटी विचार येतील. जुगार व नोकरीत अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न कराल तर सर्वस्व गमावून बसण्याची वेळ येईल. जपा. वाहन धोका असल्यामुळे वाहन सतत सवधानतेने, नियंत्रित वेगाने व ध्यान देऊनच चालवा. आर्थिक व्यवहारात घोटाळे, फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा. तसेच हनुमान उपासनाही अनुकुल होईल. दररोज नियमितपणे "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा. तसेच "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. मानसिक संवेदनाही अति वेगाने होत असल्या पाहिजेत. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैरराश्य येत असावे, असे वाटते. कारण या राशीच्या मंडळींना सध्या मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येत असेल. त्यामुळे अस्वस्थ मन, संतापी, जिद्दई अहंकारी, अस्थिर, लहरी स्वभाव झाला असेल तर मानहानी होण्याचीच जास्त शक्यता आहे. जपा. म्हणून मनावर व बुद्धीवर ताबा ठेवा, सहनशील व्हा आणि "आरे ला कारे " करू नका. असे नम्रतेचे आचरण करू शकलात तरच फारसे अनारोग्य होणार नाही. शिवाय मनस्थिती व विचारशक्ती स्थिर राहून उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना या राशीच्या तृतीय स्थानी असणारा हर्षल ग्रह अनुकुल होईल व हाती घेतलेल्या कार्यात प्रगती करणे शक्य होईल. या हर्षलमुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही शक्य आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे काही लाभदायक गोष्टी घडून येणे संभवते. हितशत्रू पराभूत होतील. पण राहू आरोग्यस्थानी असल्याने बाहेरील उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका, विष भय आहे. शिवाय काहींना पोटाचे अनारोग्य होणेही संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व सुखकारक होईल. शिवाय बुध -गुरु हे दोन्ही ग्रह अनुकुल असल्याने महिन्याचा उत्तरार्धच अधिक लाभदायक व सुखकारक होईल. महिन्याचा पूर्वार्ध नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल असून वरिष्ठांचा जाच, घरी वडील व्यक्तीचा विरोध सहन करावा लागेलसे दिसते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने सर्व जाच सुसह्य होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे फारसा त्रास होणार नसला तरी संततिसुखात काहीही कारणाने बाधा येणे शक्य दिसते. पण काही मंडळींना आर्थिक लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल "शिवोपासना " व श्री हनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे "शिवलीलामृत " स्तोत्राचे व"श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ प्रतिकुल आहे असेच म्हणावे लागेल. त्याला कारण आपले स्वाभाविक दोष, अस्थिर, चंचल मनस्थिती व विक्षिप्त आचरणच असणार आहे. म्हणून या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात मन व बुद्धी स्थिर ठेवून व सहनशील बनून आचरण केले तरच गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा सुखानंद अनुभवू शकाल. या राशीच्या धनस्थानी असलेला हर्षल अविचाराने खर्च करावयास लावेल. अस्थिर, चंचल मनस्थितीमुळे विचित्र आचरण घडणेही संभवते. तसेच अविचाराने फटकळ बोलून समोरच्याचा अपमान होणेही शक्य दिसते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला राहू दलाली, कमिशन वर व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. पण हाच राहू संततिसुखात बाधा निर्माण करील. जपा. या राशीच्या ज्या स्त्रिया गर्भवती असतील त्यांनी अकारण श्रम, दगदग करू नये. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना अनारोग्यामुळे रोग प्रतिकारशक्ती क्षीण झाल्याचा अनुभव येईल. त्यामुळे इच्छा आकांक्षा अपूर्णच राहतील. नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांची नाराजी अशापैकी कारणांनी मानहानी होणेही संभवते. बुधामुळे नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला शनि ग्रह तीव्र अशुभ असे काहीही मनोनुकुल असे घडवणार नाही; पण दूरदूरच्या प्रवासास अनुकुल होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेला केतु व मंगळ हे दोन्ही ग्रह फारसे प्रतिकुल होणार नाहीत. मंगळामुळे खूप कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. तसेच मित्रांशी वितुष्ट येणेही संभवते. पण हाच मंगळ एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभही देऊ शकेल.

नेपच्यूनमुळे गहरे नैराश्य येईल. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यमग्न असणारांना उपयुक्त होईल. अशा प्रतिकुल काळात गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने काही मंडळींना अचानक धनलाभ तर काहींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. सद्‌गुणांची वाढ होईल. सज्जनांचा सहवास लाभेल. आध्यात्मिक उपासनेत प्रगती होईल व मन:शांती लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====oooooo0ooooooo=====